# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक २८ / २०२५

घरगुती नवीन वीज जोडणी मिळणेबाबत

शिला शंकर ओतारी ........................................................................................ अपिलार्थी

विरुध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, चिपळूण (महावितरण) .......................................... प्रतिवादी १

सुनील सिताराम ओतारी .......................................... प्रतिवादी २

उपस्थिती :-

| | | |
|---|---|---|
| अपिलार्थीतर्फे | :- | १) शिला शंकर ओतारी<br>२) स्नहा शकर ओतारी<br>३) कमलाकर बुरांडे, प्रतिनिधी |
| प्रतिवादी १ तर्फे | :- | १) एस. व्ही. कैरमकोंडा, प्रभारी कार्यकारी अभियंता, चिपळूण<br>२) सुनयना समीर गांधी, सहाय्यक लेखापाल |
| प्रतिवादी २ तफ | :- | अनपस्थित |

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १५ जुलै २०२५

आदेश पारित दिनांक :- १४ ऑगष्ट २०२५

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडल, (मंच) यांच्या दिनांक ९ जानेवारी २०२५ च्या आदेशाविरुध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक १० मार्च २०२५ रोजी दाखल केले. मंचाच्या दिल्या आदेशानुसार अपिलार्थी यांनी अधिनियम १९.२२ (एच) नुसार रु.१२,०००/- चा भरणा दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी केला; म्हणून सदर अभिवेदनाची नोंदणी दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी केली. मंचाने दिनांक ९ जानेवारी २०२५ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

*"१. तक्रारदार ग्राहक श्रीमती शिला शंकर ओतारी यांनी मालमत्ता क्रमांक २१५१ वरील थकबाकी रक्कम रु.२४,२५७.३० हि अभय योजना २०२४ अंतर्गत भरावी.*

*२. सदर थकबाकी भरल्यानंतर तक्रारदार ग्राहकास वि.प. वितरण कंपनीने त्यांच्या दि.२७.०९.२०२४ च्या अर्जानुसार नवीन घरगुती वीज पुरवठा देण्यात यावा.*

*३. तक्रारदार ग्राहकांच्या इतर मागण्या नामंजूर करण्यात येत आहेत."*

<u>प्रस्तावना</u>

१) सिताराम धोंडू ओतारी, (मुळ ग्राहक) यांच्या नावे घर क्रमांक २१५१ हा असून त्या घराची वीज जोडणी (ग्राहक क्रं २१९०१०१६०२२९) दिनांक ३० ऑगष्ट १९८४ पासून होती. सदरहू ग्राहकाच्या नावात बदल जून २०१५ मध्ये 'सिताराम धोंडू ओतारी' यांच्या जागी 'सुनिल सिताराम ओतारी' असा झाला. सदर वीज जोडणीचा वीज देयकावरील पत्ता, मंजूर भार व इतर तपशिल खालील तक्ता क्रं. १ मध्ये दाखविण्यात आला आहे.

तक्ता क्रं. १ (इंग्रजीमध्ये)

| Original Name on Electric bill | Address on bill | Consumer No. | Sanctioned load | Date of Supply | Tariff | Change of Name | Date of PD | PD Arrears |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sitaram Dhondu Otari | Pethmap, Chiplun Tal-Chiplun, Dist-Ratnagiri Pin-415605 | 219010160229 | 0.26 KW | 30.08.1984 | Res. | From Sitaram Dhondu Otari to Sunil Sitaram Otari in June 2015 | 27.07.2022 | Rs. 24257/- |

२) अपिलार्थी शिला शंकर ओतारी यांची सुनिल व स्नेहा ओतारी ही दोन मुलं असुन ती नात्याने भाऊ बहीण आहेत. सदर घर क्र.२१५१ हे प्रतिवादी २ श्री.सुनील सिताराम ओतारी यांच्या नावे आहे. सदर घरामध्ये नगर परिषद दफ्तरी अपिलार्थी शिला शंकर ओतारी हे भोगवटादार म्हणून नोंद

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

आहे. सदर घर क्र.२१५१ या वास्तूचे माहे २०१७ या वर्षात घर क्र.२१५१ व घर क्र.२१५१-१ असे दोन भाग झाले. दोन्ही घरांचे कागदोपत्री मालक श्री.सुनील सिताराम ओतारी हे आहेत. श्री.सुनील सिताराम ओतारी यांनी सन २०१७ मध्ये घरगुती नवीन वीज जोडणीसाठी योग्य त्या कागदपत्रांसह अर्ज केला. महावितरणने दिनांक ६ मे २०१७ रोजी श्री.सुनील सिताराम ओतारी यांना घर क्र.२१५१-१मध्ये नवीन वीज जोडणी (वीज ग्राहक क्र. २१९०१४७८६८५८) दिली. सदर वीज जोडणीचा वीज देयकावरील पत्ता, मंजूर भार व इतर तपशिल खालील तक्ता क्रं. २ मध्ये दाखविण्यात आला आहे.

तक्ता क्रं. २

| Name | Address on bill | Consumer No. | Sanctioned load | Date of Supply | Tariff | Month of PD | PD Arrears |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sunil Sitaram Otari | S No 2151/1, Bajar Pul, Govalkot Road, Pin-415605 | 219014786858 | 0.64 | 06.05.2017 | Res. | Mar-25 | Rs.8403/- |

३) घर क्र.२१५१ मध्ये वापरलेल्या व तक्ता क्रं. १ मध्ये दर्शविलेल्या वीज जोडणीचे (ग्राहक क्रं २१९०१०१६०२२९) माहे नोव्हेंबर २०१९ पर्यंत कोणतीही थकबाकी नव्हतो. ग्राहकास वीज देयके मीटर वाचनापमाणे देण्यात आली. त्यानंतर सिपीएल चा अभ्यास करता अपिलार्थीने काही वेळा वीज देयकांच पार्ट-पेमेंट केल्याचे निदर्शनास येते. थकबाकी वाढली म्हणून जानेवारी २०२२ मध्ये वीज जोडणी ताप्तुरती खंडीत करण्यात आली व ऑगष्ट २०२२ मध्ये वीज जोडणी कायमस्वरूपी खंडीत करण्यात आली. त्यावेळी सदर वीज जोडणीवर रू.२४,२५७/- इतकी थकबाकी होती.

४) श्री.सुनील सिताराम ओतारी यांची वाणिज्य वीज जोडणी (वीज ग्राहक क्र. २१९०१०१०२६१०) असून, सदरहू वीज जोडणीचा वीज देयकावरील पत्ता, मंजूर भार व इतर तपशिल खालील तक्ता क्रं. ३ मध्ये दाखविण्यात आला आहे.

| Name | Address on bill | Consumer No. | Sanctioned load | Date of Supply | Tariff |
|---|---|---|---|---|---|
| Sunil Sitaram Otari | Bazar Peth, Chiplun, Tal. Chiplun, Dist. Ratnagiri. Chiplun, Pin-415605 | 219010102610 | 0.2 | 16.02.1981 | Comm. |

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

सदर वीज जोडणी घर क्र.२१५१ अथवा घर क्र.२१५१-१ या वास्तूची नसून बाझारपेठेतील आहे.

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १५ जुलै २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी शिला शंकर ओतारी यांनी घर क्रं.२१५१, गोवळकोट रोड, चिपळूण येथे घरगुती वीज जोडणीसाठी (ग्राहक क्र.२१९०११९१६८२६२) दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी आवश्यक कागदपत्रासह ऑनलाईन पध्दतीने (आय डी क्रं.५७६७३१६९) अर्ज दाखल केला.

- अपिलार्थीने प्रतिवादी महावितरणच्या फर्म कोटेशननुसार अनामत रक्कम रु.१३५०/-, पोसेसींग फी रु.१२०/-, व जीएसटी रु.२२/- असे एकूण रु.१४९२/- चा भरणा दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी केला. सदरहू वीज जोडणीचा वीज देयकावरील पत्ता, रक्कम भरणा केल्याची तारीख व इतर तपशिल खालील तक्ता क्रं. ४ मध्ये दाखविण्यात आला आहे.

तक्ता क्रं. ४

| Name | Address | Date of Application & purpose | Consumer No. | Firm Quotation paid | PD Arrears on same premises (S.No.2151) |
|---|---|---|---|---|---|
| Shila Shankar Otari | S No 2151,Govalkot Road, Tal - Chiplun, Dist. Ratnagiri, Pin-415605 | On 27.09.2024 for Residential purpose | 2190119168262 | Rs.1,492/- was paid on 27.09.2025 towards Security Deposit of Rs.1,350/-, Processing Fee of Rs.120/-, and GST of Rs.22/- | Rs. 24,257/- on the premises House No. 2151 |

- तक्ता क्रं. ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे व सर्व्हे क्रं.२१५१ वरील घरावर तक्ता क्रं. १ मध्ये दाखविलेल्या ग्राहक क्रमांक २१९०१०१६०२२९ ची कायमस्वरुपी थकबाकी रक्कम रु. २४,२५७.३० चा भरणा न केल्यामुळे नवीन वीज जोडणी देण्याचे महावितरणने नाकारले.

- अपिलार्थीने नमुद केले की ते त्यांच्या मुलीसह घर क्रं.२१५१ मध्ये राहत असून त्याच घराला लागून त्यांचा मुलगा श्री. सुनील ओतारी (प्रतिवादी क्रं.२) ह घर क्रं.२१५१-१ मध्ये राहत

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

आहे व त्याचा वीज ग्राहक क्र. २१९०१४७८६८५८ हा आहे. घर क्र.२१५१ हे श्री. सुनील ओतारी यांच्या नावे असून नगर परिषद दफ्तरी अपिलार्थी शिला शंकर ओतारी यांची भोगवटादार म्हणून नोंद आहे.

- प्रतिवादी २, सुनील सिताराम ओतारी यांच्या नावे तक्ता क्रं. १ मध्ये दर्शविलेला ग्राहक क्रमांक २१९०१०१६०२२९ आहे, तसेच तक्ता क्रं. २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आणखी एक वीज जोडणी दिनांक ६ मे २०१७ पासून असल्याने त्याचा ग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ असून त्यावर रु.८,४०३/- ची थकबाकी आहे.

- प्रतिवादी २, सुनील सिताराम ओतारी, ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ ची थकबाकी रक्कम माहे एप्रिल २०२४ मध्येच महावितरणने त्यांच्या वाणिज्य ग्राहक क्रं.२१९०१०१०२६१० च्या खात्यावर वर्ग केली होती. सदर बदलामूळे ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ शी असलेला संबधच महावितरणने संपवला, त्यामुळे ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ थकबाकी माहे एप्रिल २०२४ मध्ये शुन्य झालेली आहे; असे अपिलार्थीने नमुद केले आहे.
- सदर बदलानंतर श्री. सुनील सिताराम ओतारी त्यांच्या दिनांक २२ मे २०२४ च्या लेखी विनंतीनुसार त्यांच्या ज्या वाणिज्य ग्राहक क्रं. २१९०१०१०२६१० वर चढवण्यात आलेली थकबाकी नंतर प्रतिवादी २, सुनील सिताराम ओतारी यांच्या ग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ या घरगुती खात्यावर वर्ग करणे अपेक्षीत होते. परंतू ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ ची थकबाकीचा अपिलार्थीने भरणा करावा, असा हुकूम करणे म्हणजे अपिलार्थीवर अन्याय करण्यासारखे आहे.

- मा.सर्वोच्च न्यायालयाने तसेच, मा. आयोगाने या बाबत केलेले नियम हे केवळ एक किंवा दोन महिन्याच्या थकीत वीज देयकाच्या बाबतीत म्हणजेच रु.१,०००/- च्या आसपासच्या थकीत वीज देयकासाठी केले. रु.२४,२५७.३० च्या इतक्या मोठया थकबाकीकरीता असे नियम लागू नाहीत असे अपिलार्थीने नमुद केले.

- एवढी मोठी थकबाकी ही दोन महिन्यांची नसून ती माहे एप्रिल २०१८ ते डिसेंबर २०१९ या कालावधीची आहे. *(नोट : थकबाकीची रक्कम नोव्हेंबर २०१९ पासून वाढलेली आहे व ग्राहकाने काही प्रमाणात पार्ट पेमेंट केलेले आहे, परंतू पर्ण वीज देयक कधीच भरले नाही).* माहे फेब्रुवारी २०२१ पर्यंत रु.२९,५४७.६३ थकबाकी असताना दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ रोजी रु.१२,०००/-

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

आणि दिनांक १५ मार्च २०२१ रोजी रु.१२,०००/- इतक्या रक्कमेचा केलेला पार्ट पेमेंटचा भरणा स्विकृत करून पुढे आणखी ९ ते १० महिने वीज पुरवठा चालूच ठेवलेला आहे. त्यामुळे, अपिलार्थी त्यास जबाबदार नाही. सुनील सिताराम ओतारी यांच्या नावाची कायमस्वरूपी थकबाकी ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ ची असल्यामुळे ती थकबाकी सुनील सिताराम ओतारी यांच्याकडून वसूल करावी अशी विनंती करण्यात येते.

- अपिलार्थीने नमुद केले की मंचाचा आदेश रद्द करून नवीन वीज जोडणी देण्यात यावी व वीज जोडणी विलंबापोटी योग्य ती नुकसान भरपाई देण्यात यावी अशी विनंती केली.

३ प्रतिवादी १ ने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १५ जुलै २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी शिला शंकर ओतारी यांनी घर क्रं.२१५१ येथे घरगुती वीज जोडणीसाठी (ग्राहक क्र.२१९०११९६८२६२) दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी आवश्यक कागदपत्रासह ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल केला. अपिलार्थीने एकूण रु.१,४९२/- चा भरणा दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी केला. सदर वीज जोडणीचा वीज देयकावरील पत्ता, रक्कम भरणा केल्याची व इतर विस्तृत माहिती तक्ता क्रं. ४ मध्ये दाखविण्यात आली आहे.

- तक्ता क्रं. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सिताराम धोंडू ओतारी यांच्या नावे घरगुती ग्राहक क्रं. २१९०१०१६०२२९ हे घर क्रं.२१५१ मध्ये वापरासाठी घेण्यात आले होते. नंतर माहे जून २०१५ मध्ये श्री सुनील सिताराम ओतारी यांच्या नावे करण्यात आल, असे सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते. नंतर सुनील सिताराम ओतारी यांनी तक्ता क्रं. २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व्हे नं. २१५१-१ मध्ये नवीन वीज जोडणी (ग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८) घेतली.

- डिसेंबर २०१९ पासून ग्राहक क्रं. २१९०१०१६०२२९ ची थकबाकी वाढत असल्याचे निदर्शनास आले. ग्राहकाने माहे डिसेंबर १९ डिसेंबर २०१९ रोजी रु.४२०/-, दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ रोजी रु.१२,०००/- तसेच दिनांक १५ मार्च २०२१ रोजी रु.१२,०००/- रक्कमेचा भरणा केल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे एप्रिल २०२१ मध्ये अपिलार्थीची थकबाकी रु.१९,१०५/- पर्यंत राहीली. अपिलार्थीचा वीज पुरवठा दिनांक १५ डिसेंबर २०२१ रोजी तात्पुरता खंडीत करण्यात आला व दिनांक २७

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

जुलै २०२२ रोजी कायमस्वरूपी खंडीत करण्यात आला. अनामत रक्कम रु.१,२६७/- ची क्रेडीट करून ग्राहकाकडून रु.२४,२५७.३० ची कायमस्वरूपी थकबाकी माहे ऑगष्ट २०२२ पासून राहिली.

- घर क्रं.२१५१ च्या पीडी घरगुती ग्राहक क्रं. २१९०१०१६०२२९ (सुनील सिताराम ओतारी) या वीज जोडणीची थकबाकी रु.२४,२५७.३० वसूल करणेसाठी ग्राहकास ११ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या 'लोक अदालतच्या' नोटीसीन्वये कळविण्यात आले होते. त्यासंदर्भात अपिलार्थी शिला शंकर ओतारी घर क्रं.२१५१ यांच्या दिनांक २२ ऑगष्ट २०२३ रोजीच्या पत्रानुसार अपिलार्थी व त्यांची मुलगी राहात असलेल्या घर क्रं.२१५१, ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ चो थकबाकीच्या कारणास्तव मीटर काढण्यात आला होता. परत सदर थकबाकी भरण्यास अपिलार्थी आर्थिक कारणाने भरू शकत नाहीत म्हणून अपिलार्थीच्या नावाने नवीन वेगळा मीटर देण्यात यावा असे कळविले.

- प्रतिवादी २ सुनील सिताराम ओतारी यांच्या नावे दुकानासाठी घेतलेली अजून एक चालू वाणिज्य वीज जोडणी (ग्राहक क्रं. २१९०१०१०२६१०) असल्याने त्याची थकबाकी वसुली रक्कम रु.२४,२५७.३० ची त्वरीत होणेकरीता त्यांना दिनांक ३ डिसेंबर २०२३ च्या पत्रानुसार कळविण्यात आले. तसेच सदर पत्रात घर क्रं.२१५१ चा पीडी ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ ची थकबाकी त्यांच्या वाणिज्य वीज जोडणी (ग्राहक क्रं. २१९०१०१०२६१०) वर वर्ग करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार ती माहे एप्रिल २०२४ मध्ये वर्ग करण्यात आली.

- त्यानंतर प्रतिवादी २ सुनील सिताराम ओतारी यांच्या दिनांक २२ मे २०२४ रोजी महावितरणला सादर केलेल्या पत्रात कळविले की, सदर गाळा विकलेला असल्याने त्यासाठी घेतलेली सदर वाणिज्य वीज जोडणीवर वर्ग केलेली घर क्रं.२१५१ ची थकबाकी ताबडतोब काढण्यात यावी. म्हणून वाणिज्य वीज जोडणीवर टाकलेली थकबाकी घर क्रं.२१५१-१ च्या चालू घरगुती वीज जोडणी ग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ वर वर्ग केली. परंतू ग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ ची वीज जोडणीची चालू वीज देयकांचा भरणा करत नसल्याने ती वीज जोडणी थकबाकी न भरल्यामुळे दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी तात्पुरती खंडीत करण्यात आली. थकबाकी रक्कम रु.२४,२५७.३० ही क्रं.२१५१-१ ची नसून घर क्रं.२१५१ ची आहे; ज्यामध्ये अपिलार्थी श्रीमती शिला शंकर ओतारी व त्यांची मुलगी राहत आहत. त्यामुळे सदर थकबाकी घर क्रं.२१५१ ची असल्याने श्रीमती शिला शंकर ओतारी व त्यांची मुलगी यांना भरणे अनिवार्य आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी अपिलार्थी यांनी घर क्रं.२१५१ मध्ये नवीन घरगुती वीज जोडणीसाठी रितसर अर्ज केला होता व त्या अर्जास महावितरणने घर क्रं.२१५१-१ चा ग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ ची चालू वीज देयकासह रु.२७,७६०/- चा भरणा करण्याकरीता दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ च्या पत्रान्वये कळविले. त्यामध्ये घर क्रं.२१५१ ची थकबाकी रु.२४,२५७.३० इतकी होती.

- ऑगष्ट २०२४ मध्ये घर क्रं.२१५१ ची थकबाकी रु.२४,२५७.३० इतकी वीज ग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८,घर क्रं.२१५१-१ वर वर्ग करणेत आली असल्याने ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९, घर क्रं.२१५१ ची थकबाकी शुन्य दिसत आहे.

- दोन्ही वीज ग्राहकाच्या सीपीएल ची (ग्राहक वैयक्तिक खाते) पडताळणी केली असता, असे निदर्शनास येते की, डिसेंबर २०१९ ते फेब्रुवारी २०२१ पर्यंत घर क्रं.२१५१-१ वीजग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ चा वीज पुरवठा तात्पुरता स्वरूपात खंडीत करण्यात आला होता व ग्राहकाने दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ रोजी थकीत रक्कम रु.४,३४०/- चा भरणा केल्यानंतर मार्च २०२१ पासून घर क्रं.२१५१-अ वीजग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ चा वीज पुरवठा सुरू करण्यात आला.

- घर क्रं.२१५१-१ वीजग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ चे सीपीएल तपासले असता जुलै २०२१ ते डिसेंबर २०२१ या कालावधीतील वीज देयकाची रक्कम न भरल्याने दिनांक १५ डिसेंबर २०२१ रोजी घर क्रं.२१५१ चा वीज ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ व घर क्रं.२१५१-१ वीजग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ या दोन्ही वीज जोडणीचा वीज पुरवठा तात्पुरता खंडीत करण्यात आला. त्यापैकी घर क्रं.२१५१-अ वीजग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ ची थकबाकी रक्कम रु.२,२६०/- चा भरणा ग्राहकाने दिनांक २६ फेब्रुवारी २०२२ रोजी केल्याने वीज पुरवठा तात्काळ चालू करण्यात आला.

- कोविड २०२० च्या कालावधीत ग्राहकांची कोणतीही गैरसोय होऊ नये साधारण १ ते २ वर्षापर्यंत थकबाकी वसुलीच्या कार्यप्रणालीमध्ये शिथिलता आणली असल्याने थकबाकीदार ग्राहकांवर वीज पुरवठा खंडीत करण्याची कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. फेब्रुवारी २०२१ पर्यंत ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ चा मार्च २०२० ते फेब्रुवारी २०२१ या कालावधीतील वीज देयकांच पार्ट पेमेंट करून सुध्दा पुढील ८ ते ९ महिने वीज पुरवठा कायम ठेवण्यात आला होता. दिनांक १५ डिसेंबर २०२१ रोजी वीज पुरवठा तात्पुरता खंडीत करण्यात आला.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

- सद्यस्थितीत घर क्रं.२१५१-१ वीजग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ चो वीज पुरवठा थकबाकी न भरल्यामुळे दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी वीज पुरवठा तात्पूरता स्वरूपात खंडीत करण्यात आला व त्यानंतर दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी तो कायमस्वरूपी खंडीत करण्यात आला. तसेच, महावितरणने अपिलार्थीस "अभय योजनेचा" लाभ घेऊन त्या योजने अंर्तगत थकबाकी रक्कमेचा भरणा करण्यास वारंवार सांगितले, परंतू अपिलार्थीने सदर योजनेचा लाभ घेतला नाही आणि थकबाकी रक्कमेचा भरणा केलेला नाही.

- पीडी ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ घर क्रं.२१५१ ची सद्यस्थितीत थकबाकी शुन्य आहे व घर क्रं.२१५१-१, वीजग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ ची सद्यस्थितीत थकबाकी रू.३२,६६०/- दिसत आहे. ज्यामध्ये ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ घर क्रं.२१५१ ची मुळ थकबाकी रू.२४,२५७.३० समाविष्ठ आहे.

- वरील सर्व बाबींचे अवलोकन केले असता दिनांक ६ जुलै २०१७ पुर्वी घर क्रं.२१५१ व घर क्रं.२१५१-१ या दोन्ही सदनिकांचा वीज पुरवठा ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ वरून होत होता त्यानंतर त्यांचे विभाजन झाले. त्यानुसार २१५१-१ या विभाजन झालेल्या वास्तूला दिनांक ६ जुलै २०१७ रोजी नवीन वीज जोडणी वीजग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ ही सुनील ओतारी यांना देण्यात आली. घर क्रं.२१५१ याचा ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ चो थकबाकी रू.२४,२५७.३० न भरल्यामुळे वीज पुरवठा दिनांक २७ जुलै २०२२ रोजी कायमस्वरूपी खंडीत करण्यात आला. ती थकबाकी अद्यापही भरण्यात आली नाही. घर क्रं.२१५१ ची मुळ थकबाकी ऑगष्ट २०२४ रोजी घर क्रं.२१५१-१ वर वसूलीकरीता वर्ग करण्यात आली. म्हणजेच, सदरची मुळ थकबाकी घर क्रं.२१५१-१ ची नसून घर क्रं.२१५१ ची आहे, हे स्पष्ट होते. घर क्रं.२१५१ मध्ये अपिलार्थी शिला शंकर ओतारी यांनी नवीन वीज जोडणीची मागणी केली. परंतू घर क्रं.२१५१ ची मुळ थकबाकी रू.२४,२५७.३० चा पर्ण भरणा केल्यानंतरच सदर ग्राहकास नवीन वीज जोडणी देणे सयुक्तिक ठरेल.

- मंचाने त्यांच्या आदेशात अपिलार्थी शिला शंकर ओतारी यांनी घर क्रं.२१५१ ची मुळ थकबाकी रू.२४,२५७.३० "अभय योजना" २०२४ अंर्तगत भरणा केल्यानंतर दिनांक २९ जुलै २०२४ च्या अर्जानुसार नवीन वीज जोडणी देण्याचे आदेश दिले होते, परंतू अपिलार्थीने योजनेचा लाभ घेतलेला नाही आणि अद्यापही थकबाकीचा भरणा केलेला नाही.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम २०२१ च्या कलम १२.५ व १६.९.३ नुसार मुळ थकबाकी वसुल करणे बंधनकारक असल्याने व तसेच सुप्रिम कोर्टाच्या दिनांक १९ मार्च २०२३ च्या निर्णयानुसार मुळ ग्राहक किंवा नवीन ग्राहकांकडून जुनी थकबाकी वसुल करून घेणे अनिवार्य आहे.

- घर क्रं.२१५१ ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ ची मुळ थकबाकी रु.२४,२५७.३० जी घर क्रं.२१५१-१ वर वर्ग करण्यात आली आहे ती अपिलार्थी शिला शंकर ओतारी यांना भरण्याचे आदेश व्हावेत जेणे करून घर क्रं.२१५१-१ याच ठिकाणी अपिलार्थी शिला शंकर ओतारी यांना नवीन वीज जोडणी देणे शक्य होईल व उर्वरीत रक्कम रु.८,४०३/- श्री. सुनील सिताराम ओतारी यांना भरण्याचे आदेश देण्यात यावे अशी विंनती प्रतिवादी १ महावितरणने मा. विद्युत लोकपाल (मुंबई) यांना केली.

४. प्रतिवादी २ सुनिल सिताराम ओतारी हे सुनावणीस गैरहजर होते. दरम्यानच्या कालावधीत त्यांनी दिनांक २८ जुलै २०२५ च्या लेखी निवेदनात मांडलेले मुद्दे खालील प्रमाणेः

- प्रतिवादी २ सुनिल सिताराम ओतारी यांनी नमुद केले की, घर क्रं.२१५१ व घर क्रं.२१५१-१ हे फक्त त्यांच्याच मालकीचे आहे. अपिलार्थीने सदर जागेत नवीन वीज जोडणीची मागणी केली आहे; परंतू, सदर जागा व घर हे प्रतिवादी २ सुनिल सिताराम ओतारी यांच्या नावे आहे त्यावर अपिलार्थी यांचा कोणताही अधिकार वा हक्क नाही. सि.स. नंबर ११६९,११७०,११७१,११७२ व भुमापन क्रं.४३ अ २ त्यात चिपळूण नगर परिषद घर क्रं.२१५१ व घर क्रं.२१५१-१ असे आहेत. सदर मिळकत ही, कै. सिताराम धोंडू ओतारी यांच्या नावे होती व त्यांनी सनिल ओतारी यास दत्तक घेतलेले आहे. त्यांनी त्यांचे मृत्युपत्र रजिस्टर कार्यालय, चिपळूण येथे दिनांक १६ डिसेंबर २००५, दस्त क्रं.३५५३ सन २००५ असे नोंद केलेली आहे.

- अपिलार्थी व त्यांची मुलगी स्नेहा शहाजी ओतारी यांनी वीज जोडणीसाठी केलेल्या अर्जासोबत चिपळूण नगर परिषद यांच्याकडील घर क्रं.२१५१ व घर क्रं.२१५१-१ चे असेसमेंट उतारे हे खोटे व बनावटी आहेत. सदर उताऱ्यावर अपिलार्थी शिला शंकर ओतारी यांचे नाव नाही, तसेच,

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

चिपळूण नगर परिषदेच्या रेकॉर्डवर सुध्दा अपिलार्थी शिला शंकर ओतारी यांचे नाव नाही. अपिलार्थीने प्रतिवादी २ सुनील सिताराम ओतारी यांच्या नावाखाली स्वतःचे नाव टाकले आहे जे प्रतिवादी २ सुनील सिताराम ओतारी यांनी काढून टाकलेले आहे. अपिलार्थीचा प्रतिवादी २ सुनील सिताराम ओतारी यांच्याशी काहीही संबध नाही ते त्यांच्या घरात जबरदस्तीने मिळकत बळकवण्याच्या हेतूने राहत आहेत. वीजग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ वरील थकबाकी ही प्रतिवादी २ सुनील सिताराम ओतारी यांची आहे व तीचा भरणा करण्यास ते जबाबदार आहेत. प्रतिवादी २ सुनील सिताराम ओतारी यांनी विनंती केली की सदर जागेत प्रतिवादी २ शिवाय कोणालाही वीज जोडणी देऊ नये.

विश्लषण व निर्णय

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. वरील प्रकरणाचा अभ्यास केला असता निदर्शनास येते की, घर क्रं.२१५१ तक्ता क्रं.१ मध्ये दर्शविलेल्या ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ चा वीज पुरवठा दिनांक ३० ऑगष्ट १९८४ पासून वापरण्यात येत होता. माहे जून २०१५ मध्ये वरील वीज जोडणीच्या नावात बदल (सिताराम धोंडू ओतारी ते सुनील सिताराम ओतारी) असे करण्यात आल्याचे कागदपत्रावरून दिसते. सन २०१७ मध्ये सुनील सिताराम ओतारी यांनी नवीन घरगुती वीज जोडणी घर क्रं.२१५१-१ साठी तक्ता क्रं.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे दिनांक ६ मे २०१७ रोजी घेतली. तेव्हा पासून घर क्रं.२१५१ साठी ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ चा वापर होत असल्याचे निदर्शनास येते. तसेच घर क्रं.२१५१-१ साठी ग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ चा वापर होत असल्याचे निदर्शनात येते. दोन्ही ग्राहक क्रं. सुनोल सिताराम ओतारी यांच्या नावे आहेत.

६. नोव्हेंबर २०१९ पर्यंत घर क्रं.२१५१ वापरत असलेल्या ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ ची वीज देयके भरल्याचे सिपीएल वरून निदर्शनात येते. परंतू त्यानंतर काही प्रामणात पार्ट पेमेंट करण्यात आले असले तरी थकबाकी वाढत गेली. सदरहू घराचा वीज पुरवठा दिनांक १५ डिसेंबर २०२१ रोजी तात्पुरता खंडीत करण्यात आला व दिनांक २७ जुलै २०२२ रोजी कायमस्वरूपी खंडीत करण्यात आला. अनामत रक्कम रू.१,२६७/- ची क्रेडीट करून ग्राहकाकडून रू.२४,२५७.३० ची कायमस्वरूपी थकबाकी माहे ऑगष्ट २०२२ पासून राहिली.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

७. घर क्रं.२१५१-१ या ठिकाणची वीज जोडणी ग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ सुध्दा वेळेत वीज देयकांचा भरणा न केल्यामुळे व थकबाकी वाढत गेल्यामुळे डिसेंबर २०२४ रोजी वीज पुरवठा तात्पुरता खंडीत करण्यात आला. त्यानंतर थकबाकी रक्कम रू.८,४०३/- चा भरणा न केल्यामुळे जानेवारी २०२५ मध्ये कायमस्वरूपी खंडीत करण्यात आला. सद्यस्थितीत प्रतिवादींच्या निवेदनानुसार कोणतेही व्याज व विलंबआकार न आकारला तर खालीलप्रमाणे थकबाकी आहे.

१. घर क्रं.२१५१ मधील ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ वर रू.२४,२५७.३० ची कायमस्वरूपी थकबाकी आहे.

२. घर क्रं.२१५१-१ मधील ग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ वर रू.८,४०३/- ची थकबाकी आहे.

त्यानुसार खालील मुद्दा उपस्थित करण्यात येत आहे.

मुद्दा - अपिलार्थी शिला शंकर ओतारी यांनी घर क्रं.२१५१ मध्ये नवीन वीज जोडणी दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी मागितलेली आहे. त्यानी घर क्रं.२१५१ ची रू.२४,२५७.३० इतकी थकबाकी भरणे आवश्यक आहे का?

उत्तर : होय, अपिलार्थी शिला शंकर ओतारी यांनी घर क्रं.२१५१ ची थकबाकी भरणे गरजेचे आहे.

८. माननीय सर्वोच्च न्यायालय यांच्या सिव्हील अपिल क्रमांक २१०९-२११०/२००४ मधील के.सी. निनाद विरूध्द केरळ इलेक्ट्रीसिटी बोर्ड व इतर यांच्याबाबत दिलेल्या दिनांक १९ मे २०२३ च्या आदेशामध्ये खालील प्रमाण उल्लेख केला आहे.

1. *"………..*
2. *In terms of the signed reportable judgment the court summarized the following conclusions.*
   a. *The duty to supply electricity under section 43 of the 2003 Act is not absolute, and is subject to the such charges and compliance stipulated by the Electric Utilities as part of the application for supply of electricity.*
   b. *The duty of supply electricity under Section 43 is with respect to the owner or occupier of the premises. The 2003 Act contemplates a synergy between the consumer and premises. Under Section 43, when electricity is supplied, the owner or occupier becomes a consumer only with respect to those particular premises for which electricity is sought and provided by the Electric utility.*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

c. *For an application to be considered as a 'reconnection', the applicant has to seek supply of electricity with respect to the same premises for which electricity was already provided. Even if the consumer is the same, but the premises are different. It will be considered as a fresh connection and not a reconnection;.*

d. *A condition of supply enacted under section 49 of the 1948 Act requiring the new owner of the premises to clear the electricity arrears of the previous owner as a precondition to availing electricity supply will have a statutory character.*

e. *The scope of the regulatory powers of the State Commission under Section 50 of the 2003 Act is wide enough to stipulate conditions for recovery of electricity arrears of previous owner from new or subsequent owners;*

f. *The Electricity Supply Code providing for recoupment of electricity dues of a previous consumer from a new owner have a reasonable nexus with the objects of the 2003 Act.*

g. *The rule making power contained under Section 181 read with Section 50 of the 2003 Act is wide enough to enable the regulatory commission to provide for statutory charge in the absence of a provision in the plenary situation providing for creation of such charge.*

h. *The power of initiate recovery proceedings by filing a suit against the defaulting consumer is independent of the power to disconnect electrical supply as a means of recovery under Section 56 of the 2003 Act.*

९. वरील आदेशावरुन वीज कायदा २००३ मधील कलम ४३ अन्वये वीज वितरण कंपनीला ग्राहकास वीज पुरवठा करणे बंधनकारक असले; तरी सुध्दा, त्या ठिकाणी जर अगोदरच्या वहीवाटदार अथवा मालक यांची वीज देयकाची थकबाकी असल्यास; ती थकबाकी भरण्याची जबाबदारी येणाऱ्या नवीन ग्राहकावर आहे. सदर केसमध्ये थकीत असणाऱ्या ग्राहकाचे वापरकर्ते व नवीन घरगुती वीज जोडणीसाठी अर्ज केलेले अर्जदार व वहिवाटदार हे शिला शंकर ओतारी हेच आहेत.

१०. महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलिटी) विनियम २०२१ (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विनियम २०२१) मधील विनियम १२.५ व १६.९.३ मधील तरतूद खालील प्रमाणे आहे.

*"१२.५ कोणत्याही जागेचा मृत ग्राहक किंवा पुर्वीच्या मालक / वहिवाटदाराकडून जसे असेल तसे, वितरण परवानाधारकास देय असलेल्या विजेचा कोणताही आकार किंवा विजेच्या आकारा व्यतिरीक्त अन्य*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

*कोणतीही रक्कम त्यास अदा करणे बाकी राहीले असेल तर सदर रक्कम अशा जागेचा कायदेशीर, प्रतिनिधी / कायदेशीर उत्तराधिकारी किंवा नवीन मालक / वहिवाटदार, जसे असेल तसे त्यांना हस्तांतरीत केलेल्या जागेवर येणे आकार म्हणून लागू राहील आणि तो जागेच्या अशा कायदेशीर / प्रतिनिधी वारस किवा नवीन मालक / वहिवाटदार, जसे असेल तसे, यांच्याकडून वितरण परवानाधारकास देय व वसूली योग्य राहिल.*

*१६.९.३ ज्या इमारतीचा पुरवठा कायम स्वरूपी खंडति करण्यात आला असेल किंवा त्या पुर्नबांधणीसाठी पाडण्यात आल्या असतील अशा इमारतीच्या थकबाकीचे दायित्व, असल्यास मालक / वहिवाटदारांवर राहील."*

११. वरील दोन्ही तरतूदीनुसार घर क्रं.२१५१ ग्राहक क्रं.२१९०१०१६०२२९ ची मुळ थकबाकी रू.२४,२५७.३० भरण्याची पर्ण जबाबदारी ही सदर वास्तूतील सद्याचे वहीवाटदार म्हणून अपिलार्थी शिला शंकर ओतारी यांची राहील. तसेच, त्याच ठिकाणी घर क्रं.२१५१-१ साठी ग्राहक क्रं.२१९०१४७८६८५८ चा वापर सुनील सिताराम ओतारी करत असल्याचे निदर्शनात येते, त्याची थकबाकी रक्कम रू.८,४०३/- इतकी आहे, त्याचा भरणा सुनील सिताराम ओतारी यांनी करणे बंधनकारक आहे. महावितरणकडून "अभय योजना २०२४" कार्यान्वीत होती, त्या योजने अंतर्गत कायमस्वरूपी खंडीत असणाऱ्या ग्राहकाकडील थकबाकी रक्कमेतील मुद्दल एक रकमी भरल्यास त्यावरील व्याज व विलंब आकार माफ करण्यात आले होते. सदर योजनेचा विषेश बाब म्हणून अपिलार्थी लाभ घेऊ शकतात वा महावितरण अधिकारी यांच्यासोबत विचार विनियम करून सुलभ हफ्त्याची मागणी करून विहीत हफ्त्यात सदर रक्कमेचा भरणा करू शकतात. सदर थकबाकी रक्कमेचा भरणा केल्यानंतरच नवीन वीज जोडणीच्या मागणीनुसार ती देण्यात येईल.

१२. वरील सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थींना आदेशीत करण्यात येते.

- अपिलार्थीने घर क्रं.२१५१ साठी नवीन वीज जोडणीकरीता थकबाकीची रक्कम रू.२४,२५७.३० भरणे अनिवार्य आहे.

- अपिलार्थीने या कार्यालयाकडे भरणा केलेली अनामत रक्कम रू.१२,०००/- त्यांच्या थकबाकीत समायोजीत करण्यात येईल. सदर रक्कम या कार्यालयाकडून परस्पर प्रतिवादी महावितरण चिपळूण कार्यालयाकडे एनईएफटी द्वारे पाठविण्यात येईल. उर्वरीत रक्कम भरण्यासाठी अपिलार्थीस १२ समान हफ्ते करून देण्यात यावेत व त्यावरील व्याज व विलंब आकार माफ करावा.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- उर्वरीत थकबाकीचा पहिला हफ्ता भरणा केल्यानंतर त्वरीत त्यांची वीज जोडणी देताना आवश्यक ती कागदपत्राची पुर्तता केल्यावर दोन आठवडयात देण्यात यावी.

- आदेशाचे अनुपालन अहवाल आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात सादर करण्यात यावा.

- अपिलार्थीच्या इतर मागण्या फेटाळण्यात येत आहेत.

सही/-
(वंदना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai